28-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 6/27/2025 11:42 PM Page 1



# 'ड्रग्ज' रॅकेट चालवणाऱ्या योग गुरूचे गोवा कनेक्शन उघड

▶ काणकोणमध्ये वास्तव्यास होता क्रांती योग' संस्थापक तरुण अग्रवाल

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७ :** छत्तीसगडमधील डोंगरगढ येथे एका आश्रमातून अमली पदार्थाच्या तस्करी प्रकरणी अटक झालेला आंतरराष्ट्रीय योगगुरू तरुण अग्रवाल उर्फ 'सोनू' याच्या अटकेमुळे गोव्यातील आध्यात्मिक पर्यटन' क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे.

छत्तीसगड पोलिसांच्या हाती लागलेल्या माहितीनुसार, अग्रवाल हा गोव्याच्या काणकोण तालुक्यातील पाटणे येथील क्रांती योग' या रिट्रीटचा संस्थापक आणि व्यवस्थापक आहे. पाटणे समुद्रकिनाऱ्यालगत त्याचे आध्यात्मिक केंद्र असून, याठिकाणी तो योगाभ्यास, डिटॉक्स कार्यक्रम आणि 'स्पिरिच्युअल हीलिंग'च्या नावाखाली परदेशी पर्यटकांचे आकर्षण केंद्र बनला होता.

डोंगरगढ पोलिस ठाण्याचे प्रभारी जितेंद्र वर्मा यांनी हेराल्डला दिलेल्या माहितीनुसार , अटकेवेळी तरुणकडून सुमारे १.९९३ किलो गांजा जप्त करण्यात आला. त्याच्या ताब्यातील आधार कार्डावर त्याने स्वतःला 'योगी तरुण क्रांती अग्रवाल' असे नमूद केले असून, पत्ता पाटणे , काणकोण (घर नंबर . १३५) दर्शवण्यात आला आहे.



छत्तीसगडचा मूळ रहिवासी असलेला तरुण गेली दोन दशके गोव्यात वास्तव्यास होता. पाटणे मधील क्रांती योग' हे त्याचे प्रमुख केंद्र असून, तेथे परदेशी पर्यटकांच्या वर्दळीमुळे तो वेगाने लोकप्रिय झाला होता. स्थानिक लोकांच्या म्हणण्यानुसार, त्याचा प्रभाव प्रचंड होता, मात्र प्रत्यक्षात काय सुरू होते याकडे कोणी पाहिलेच नाही.

गोव्यातील यशस्वी मॉडेलनंतर तरुणने डोंगरगढमध्येही अध्यात्माच्या आडून ड्रग्ज रॅकेट सुरू केले. ध्यान केंद्राच्या रूपात सुरू झालेल्या आश्रमातून अल्पवयीन मुलांना आकर्षित करून त्यांच्याकडून अंमली पदार्थांचा पुरवठा करवून घेत असल्याचे उघड झाले आहे. पोलिसांनी वेळीच कारवाई करत या लघु ड्रग्ज प्रयोगशाळेचा भांडाफोड केला.

काणकोण पोलिसांच्या सूत्रांनुसार आतापर्यंत तरुणविरोधात गोव्यात कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही. मात्र,पोलिसांनी स्थानिक स्तरावर तपास सुरू केला आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तरुण अग्रवालने दहा पेक्षा अधिक एनजीओच्या नोंदी करून, परदेशी निधी उभारला होता. त्याच्या या संस्थांची सध्या ड्रग्ज तस्करी व मनी लॉन्डरिंगशी संबंधित संभाव्य संबंधांसाठी चौकशी सुरू आहे. त्याच्या डोंगरगढ आश्रमातून जप्त करण्यात आलेली उपकरणे, परदेशी मालबॉक्स आणि व्हिडीओ उपकरणे गोव्यातून पाठवण्यात आली असावीत, असा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

तरुण अग्रवालचा प्रकार हा अपवाद नाही. मागील काही महिन्यांत विविध राज्यांतील फरार आरोपी, क्रिप्टो फसवणूकदार, भूमी घोटाळ्यातील आरोपी आणि एनडीपीएस प्रकरणांतील वॉन्टेड आरोपी गोव्यात व्यवसाय सुरू करून राहात असल्याचे उघड झाले आहे.

पर्यटनाच्या नावाखाली गोव्यात गुन्हेगार आश्रय घेत आहेत. यामागे ढिसाळ पोलिसिंग आणि संपुष्टात आलेले बीट सिस्टम हे मुख्य कारण आहे. पूर्वीचे बीट कॉन्स्टेबल म्हणजे पोलिसांचे कान आणि डोळे होते, पण आज ते नेटवर्क हरवले आहे असे ज्येष्ठ निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांचे मत आहे .

तरुण अग्रवालची कहाणी ही गोव्यात वेलनेस पर्यटन'च्या नावाखाली कसा काळा पैसा, अंमली पदार्थांचे व्यवहार आणि फसवणूक चालते याचे उदाहरण बनली आहे. अध्यात्माच्या मुखवट्याआड लपलेला गुन्हेगारीचा चेहरा आता उघड झाला असून, क्रांती योग' व संबंधित संस्थांवर प्रशासनाने चौकशीचे चक्र फिरवले आहे.गोव्यातील पर्यटन धोरण, परदेशी निधीवर आधारित एनजीओंचे निरीक्षण आणि आध्यात्मिक केंद्रांची पारदर्शकता हे सर्व मुद्दे या प्रकरणामुळे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

# मांस विक्रेत्यांसाठी तात्पुरत्या शेडचे काम अंतिम टप्प्यात



■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७ :** सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, पणजी मासळी बाजारातील मांस विक्रेत्यांसाठी सहा तात्पुरत्या शेडचे बांधकाम अंतिम टप्प्यात असून, पुढील आठवड्यात हे काम पूर्ण होण्याची अपेक्षा आहे. सध्या बी एस कन्स्ट्रक्शनकडून हे काम युद्धपातळीवर सुरू आहे. या कामासाठी सुमारे ₹९.७ लाखांची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

या शेड्सचे बांधकाम गेल्या शुक्रवारी सुरू झाले. पणजी महानगरपालिकेच्या मान्यतेनंतर सुप्रीम कोर्टाने जुन्या मासळी बाजार संकुलातील मांस विक्रेत्यांना तात्पुरत्या स्वरूपात पुनर्वसन करून व्यवसाय पुन्हा सुरू करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार, या शेडमध्ये विक्रेत्यांसाठी डीप फ्रीजर, कटिंग सुविधा, शटरयुक्त स्टॉल्स यांचा समावेश असणार आहे.

ऑल गोवा बीफ व्हेंडर्स असोसिएशनचे अध्यक्ष मन्नसाब बेपारी यांनी समाधान व्यक्त करत सांगितले की, चार महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर आता काम पूर्ण होत असल्याने आम्ही आशावादी आहोत. सध्या मी कोणतेही मांस विकत नाही. दीड वर्षांपासून आमचा व्यवसाय ठप्प आहे आणि बचतीवर गुजराण करावी लागत आहे. आम्ही पोर्तुगीज काळापासून या व्यवसायात आहोत. मी चौथी पिढी आहे आणि आता लवकरच व्यवसाय पुन्हा सुरू होईल, याची अपेक्षा आहे.

गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये सीसीपीने मासळी बाजारातील दुकाने सील केल्यानंतर विक्रेत्यांचे रोजीरोटीचे साधनच संपले. २१ ऑगस्ट २०२४ रोजी संबंधित इमारत असुरक्षित घोषित केल्यानंतर ही कारवाई करण्यात आली होती. या दुकानांमध्ये प्रामुख्याने मांस विक्रेते कार्यरत होते. स्थानिक प्रशासनाने या दुकानदारांना जागा रिकामी करण्यास नोटिसा दिल्या होत्या.

या निर्णयामुळे विक्रेते, कामगार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबियांना अंधकारमय भविष्याची भीती वाटू लागली होती. त्यामुळे विक्रेत्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. न्यायालयाने त्यांच्या बाजूने निर्णय देत, तात्पुरत्या शेड्सद्वारे त्यांचे पुनर्वसन करण्याचे आदेश दिले.

बांधकामाला चार महिने लागल्याच्या कारणावर सीसीपीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी वेळ लागतो. त्यामुळे काम सुरू होण्यास विलंब झाला. मात्र आता सर्व प्रक्रिया मार्गी लागल्यामुळे विक्रेत्यांना लवकरच शेडमध्ये व्यवसाय सुरू करता येणार आहे.या शेड्सच्या पूर्णत्वामुळे मासळी बाजारातील मांस विक्रेत्यांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांच्या उपजीविकेचे दरवाजे पुन्हा उघडतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# धोकादायक इमारतींवर कडक कारवाईचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७ :** पावसाळ्यात वाढणाऱ्या आपत्तीच्या संभाव्य धोक्याला तोंड देण्यासाठी आणि सार्वजनिक सुरक्षेला प्राधान्य देत राज्य सरकारने राज्यभरातील धोकादायक, मोडकळीस आलेल्या आणि राहण्यासाठी अयोग्य अशा जुन्या इमारतींवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

राज्यात मडगाव, म्हापसा आणि अन्य भागांमध्ये अशा असुरक्षित इमारती संदर्भातील घटनांमध्ये वाढ झाल्याने, आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत हे आदेश जारी करण्यात आले आहेत. अवर सचिव (महसूल–३ ) यांच्या हस्ताक्षरित निर्देशांनुसार जिल्हा प्रशासनाला संरचनात्मक दृष्टिकोनातून धोकादायक इमारतींची ओळख पटवून प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाय तातडीने राबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणांमार्फत एक पद्धतशीर तपासणी मोहीम हाती घेण्यात येणार असून, संबंधित जिल्हाधिकारी हे त्या विभागाचे अध्यक्ष म्हणून पुढाकार घेणार आहेत. त्यांना अशा इमारतींची ओळख करून आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे अधिकार दिले गेले आहेत.

प्रमुख उपाययोजनांमध्ये जिल्हास्तरावर असुरक्षित आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचे सर्वेक्षण करणे , स्थानिक स्वराज्य संस्था – नगरपरिषद, नगरपालिका व पंचायती यांच्याशी समन्वय साधणे , अशा इमारतींची यादी तयार करून त्यांचे संरचनात्मक मूल्यांकन करणे , मालक किंवा रहिवाशांना नोटिसा देणे आणि गरजेनुसार बॅरिकेडिंग, रिकामी करणे किंवा इमारत पाडण्यासारख्या कठोर उपायांची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे.

परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे की, जर स्थानिक प्रशासन कारवाई करण्यात कुचराई करेल, तर जिल्हाधिकाऱ्यांना आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत थेट हस्तक्षेप करून आवश्यक ती कारवाई करण्याचे अधिकार आहेत. यामध्ये सार्वजनिक हितासाठी धोकादायक इमारती पाडण्याचा किंवा इतर प्रतिबंधात्मक पावले उचलण्याचा समावेश आहे.

राज्यातील काही भागांमध्ये अलीकडच्या काळात झालेल्या इमारतींच्या अपयशाच्या घटना पावसाळ्यातील संभाव्य आपत्तीची झलक देतात. त्यामुळे अशा इमारतींच्या तपासणीस विलंब न करता तीव्र गतीने अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक झाले आहे, असे शासनाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना महसूल विभागाकडे या कारवाईबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेशही देण्यात आले असून, त्यावर आधारित पुढील निर्णय शासन पातळीवर घेतले जातील.

# पर्पल फेस्ट २०२५ : ९ ते १२ ऑक्टोबर दरम्यान गोव्यात होणार आंतरराष्ट्रीय महोत्सव




■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७ :** दिव्यांग व्यक्तींना सन्मानाची व समतेची वागणूक देण्याचा विचार पुढे नेणाऱ्या आंतरराष्ट्रीय पर्पल फेस्ट – गोवा २०२५ चा सोहळा ९ ते १२ ऑक्टोबर दरम्यान गोव्यात पार पडणार आहे. सर्वसमावेशक विचार या संकल्पनेवर आधारित हा महोत्सव युनिव्हर्सल डिझाइन म्हणजेच सर्वांसाठी सुलभ अशा पायाभूत सुविधा, उत्पादने, सेवा आणि तंत्रज्ञान यांना प्रोत्साहन देणार आहे.

गोवा सरकारच्या दिव्यांगजन सक्षमीकरण विभाग आणि राज्य दिव्यांग आयुक्त कार्यालय यांच्या पुढाकाराने आणि भारत सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयासह युनायटेड नेशन्स इंडिया यांच्या सहकार्याने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. यंदा ग्रामीण भागातील समावेशकतेवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार असून, आरोग्य,

▶ सर्वसमावेशकतेचा जागर

▶ ग्रामीण भागाला विशेष स्थान

शिक्षण, प्रवास यांसारख्या मूलभूत सेवा ग्रामीण दिव्यांगांसाठी सहजसुलभ कशा बनवता येतील, यावर चर्चा होणार आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत*यांनी महोत्सवाच्या नोंदणी प्रक्रियेला सुरुवात केली. यंदा युनिव्हर्सल डिझाइनचा विचार केवळ धोरणांपुरता मर्यादित न ठेवता, प्रत्यक्षात कृतीत उतरवण्याचा आमचा उद्देश आहे, असे ते म्हणाले.

दिव्यांगजन सक्षमीकरण मंत्री सुभाष फळदेसाई यांनी सांगितले की, ग्रामीण भागातील दिव्यांगांना भेडसावणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन, त्यांच्या अनुभवांना व्यासपीठ मिळावे यासाठी ग्रामीण समावेशन परिषद' आयोजित केली जात आहे.

या फेस्टिव्हलची नोंदणी फक्त झ्ीीश्रिश त्रशीीं त्रेर' या मोबाइल ॲपद्वारे करता येणार आहे. सहभागी प्रतिनिधींना ॲपमार्फत कार्यक्रमाचे वेळापत्रक, स्थळ व अन्य माहिती दिली जाणार आहे.

या महोत्सवात पर्पल थिंक टँक, पर्पल कॉन्फरन्स, डिझाईन फॉर ऑल चॅलेंज, पर्पल स्ट्रीट, पर्पल कॅलिडोस्कोप, पर्पल रेन आणि पर्पल स्पोर्ट्ससारखे अनेक उपक्रम होणार आहेत. विशेष म्हणजे, १०० हून अधिक दालनांमधून दिव्यांग व्यक्तींनी तयार केलेली उत्पादने व सेवा सादर केली जाणार आहेत.

राज्य दिव्यांग आयुक्त गुरुप्रसाद पावसकर यांनी म्हटले, हा महोत्सव आता केवळ कार्यक्रम राहिला नसून, एक समावेशकतेची चळवळ बनला आहे. यामधून नवे विचार, धोरणे आणि उपाय पुढे येतील.

पर्पल फेस्ट गोवा २०२५ हा एकमेव असा प्लॅटफॉर्म आहे जो विचार, कृती आणि परिवर्तन या त्रिसूत्रीवर आधारित असून, दिव्यांगांबरोबरच प्रत्येकासाठी समावेशक समाज घडवण्याचा ध्यास घेऊन पुढे जात आहे.

# ढवळी–फर्मागुडी महामार्गावर कार पेटली

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २७ :** ढवळी–फर्मागुडी महामार्गावर धावत्या कारला शुक्रवारी संध्याकाळी अचानक भीषण आग लागल्याची घटना घडली. सुदैवाने चालकाने वेळीच कारमधून बाहेर पडून आपला जीव वाचवला, मात्र वाहनाचा बहुतांश भाग जळून खाक झाला.

अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी वाहतूक काही वेळ ठप्प झाली होती. कारमध्ये चालकासोबत आणखी एक साथीदार होता. दोघांनी मिळून कारमधील सामान वाचवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, एक जागरूक वाटसरूने तात्काळ अग्निशमन विभागाला सूचना दिली.

अग्निशमन दलाने घटनास्थळी वेगाने धाव घेतली आणि आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न केले. मात्र, आग इतकी भयानक होती की जवळपास संपूर्ण कार जळून खाक झाली. प्राथमिक माहितीनुसार, डॅशबोर्डमधील शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज कारचालकाने व्यक्त केला आहे.

या घटनेमुळे काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. पुढील तपास पोलीस आणि अग्निशमन विभागाकडून सुरू आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



# कोलवाळ तुरुंगातील 'गोठा पार्टी' प्रकरणी वॉर्डन निलंबित

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २७ :** कोलवाळ मध्यवर्ती कारागृहातील गोठ्यात काही कैद्यांनी पार्टी केल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर तुरुंग प्रशासनात खळबळ माजली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत गोठ्याचे वॉर्डन नारायण नाईक यांना सेवेत कसूर केल्याच्या आरोपाखाली निलंबित करण्यात आले आहे.

तुरुंग विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने गोवा कारागृह महानिरीक्षकांना (आयजी प्रिझन्स) पत्र लिहून संबंधित अधिकाऱ्याने आपले कर्तव्य पार पाडण्यात हलगर्जीपणा केल्याचे निदर्शनास आणून दिले होते. त्यानंतर नाईक यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

सध्या कारागृह महानिरीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळणारे पोलीस महानिरीक्षक (आयजीपी) केशव राम चौरसिया यांनी नाईक यांच्यावर निलंबनाचे आदेश बजावले. नाईक यांच्याविरुद्ध यापूर्वीच कर्तव्यकठोरतेसंदर्भात तीन विभागीय चौकशाही सुरू असल्याची माहिती आहे.

नाव न छापण्याच्या अटीवर बोलताना एका अधिकाऱ्याने सांगितले की, गेल्या एक वर्षात कोलवाळ तुरुंगावर चार वेळा छापे टाकण्यात आले असून, मोबाईल वापरताना आढळलेल्या कैद्यांमुळे आतापर्यंत तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. प्रत्येक महिन्याला तुरुंगात काही ना काही अनुचित प्रकार घडत असतो. व्यवस्थेत सध्या कोणताही विश्वासार्ह अधिकारी उरलेला नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र, सध्याचे आयजीपी कारागृह प्रशासनातील गैरप्रकार आणि भ्रष्टाचार उघड करण्यासाठी कटिबद्ध असून लवकरच परिस्थितीत सुधारणा होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.




२२ मे २०२५ रोजी संध्याकाळी कोलवाळ केंद्रीय कारागृहाच्या गोठ्यात पाच कैदी पार्टी करताना सापडले होते. ही घटना तेव्हा उघडकीस आली, जेव्हा गस्तीवर असलेल्या इंडियन रिझर्व्ह बटालियनच्या (आयआरबी ) जवानांना गोठ्याजवळ संशयास्पद हालचाली जाणवू लागल्या.

त्यानंतर करण्यात आलेल्या तपासणीदरम्यान चार कैदी ब्लूटूथ स्पीकरवर संगीत ऐकत आणि अज्ञात पदार्थांसह खाद्यपदार्थांचा आनंद घेत असल्याचे निदर्शनास आले. अधिकाऱ्यांनी तातडीने पीएसआय गौरीश राव यांना सतर्क केले. त्यानंतर पीएसआय विशेष चोडणकर यांच्या नेतृत्वाखाली हेड कॉन्स्टेबल मा. डि'कोस्टा, मधु साळगावकर, बबली गाडेकर आणि प्रीतेश तलव यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

पथकाने घटनास्थळावरून एक स्मार्टफोन, ब्लूटूथ स्पीकर, अज्ञात पदार्थाची दोन पॅकेट्स आणि मासे व अन्य अन्नपदार्थांची पॅकेट्स जप्त केली आहेत.

तुरुंगातील नियमानुसार, या कैद्यांना सफाई व गोठ्यात दूध काढण्याच्या कामासाठी घेऊन जाण्यात आले होते. मात्र, त्यांच्यावर लक्ष ठेवणारा सुरक्षा रक्षक त्यांना नजरचुकीने एकटं सोडून गेला, त्यामुळे ही 'पार्टी' जवळपास ४५ मिनिटांपर्यंत सुरू राहिली, अशी माहिती मिळाली आहे.

या प्रकरणामुळे तुरुंग प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर पुन्हा एकदा गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, वरिष्ठ पातळीवर सुधारणा आवश्यक असल्याची मागणी अधिक तीव्र होत आहे.

# मडगाव–पणजी कदंब बससेवा धोकादायक स्थितीत ?

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २७ :** मडगाव–पणजी या प्रमुख मार्गावर धावणाऱ्या कदंब ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन (केटीसी)च्या बसगाड्यांची दयनीय अवस्था प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर धोका निर्माण करत असून, या बाबत व्ही. एम. साळगावकर कॉलेज ऑफ लॉमधील विद्यार्थिनीने तक्रार नोंदवली आहे.

चिंचिणी येथील रहिवासी आणि नियमित प्रवासी असलेल्या अवेना रिबेलो यांनी केटीसी अधिकाऱ्यांकडे सादर केलेल्या लेखी तक्रारीत म्हटले आहे की, या मार्गावर धावणाऱ्या बसेस केवळ अस्वच्छच नाहीत तर धोकादायक देखील आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, तुटलेल्या खिडक्या, फाटलेल्या सीट्स, इंजिनचा कर्कश आवाज, तसेच पावसाळ्यात गळती होणारी छतं या साऱ्या बाबी प्रवास त्रासदायक बनवतात.

बसमधून पाणी टपकत असल्याने प्रवासी वारंवार भिजतात आणि प्रवास अत्यंत अस्वस्थ होतो, अशी रिबेलो यांची तक्रार आहे.

▶ कायद्याच्या विद्यार्थिनीची तक्रार

तक्रारीत अस्वच्छतेचा मुद्दा अधिक ठळकपणे मांडत रिबेलो यांनी नमूद केले की, बसमध्ये प्लास्टिक, उरलेले अन्नपदार्थ, तसेच कचरा सर्वत्र विखुरलेला असतो. बसगाड्या दररोज स्वच्छ केल्या जातात का, यावरच प्रश्नचिन्ह आहे, असे त्या म्हणाल्या.

याशिवाय, बसेस वारंवार बंद पडत असल्यामुळे विद्यार्थ्यांपासून वृद्धांपर्यंत आणि नोकरदारांपर्यंत सर्वच प्रवाश्यांचे दैनंदिन वेळापत्रक बिघडते. या बससेवेवरील अवलंबित्व असूनही देखभाल आणि नियोजनशून्यतेमुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवरील विश्वास ढासळत आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बाबत त्वरित उपाययोजना करण्याचे आवाहन करताना, त्यांनी कदंब प्रशासनाला मार्गावरील सर्व बसगाड्यांची तांत्रिक तपासणी व नियमित स्वच्छतेसह देखभाल करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, प्रवाशांच्या हितासाठी न्यायालयाचा दरवाजा ठोठावण्याचा इशाराही त्यांनी दिला. रिबेलो यांची तक्रार उघडकीस आल्यानंतर अशाच प्रकारच्या अडचणी अनुभवणाऱ्या इतर प्रवाशांचाही आवाज बुलंद होऊ लागला आहे. दररोज हजारो प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या या महत्त्वाच्या मार्गासाठी सुरक्षित, स्वच्छ व विश्वासार्ह बससेवेची मागणी पुन्हा एकदा तीव्र झाली आहे.सरकार आणि कदंब प्रशासनाकडून या तक्रारीची दखल घेऊन तातडीने सुधारणा होण्याची प्रवाशांकडून अपेक्षा व्यक्त होत आहे.

**विक्रीसाठी**
**व्यावसायिक मालमत्ता**
अग्रगण्य बँकेकडे खालील व्यावसायिक मालमत्ता **'जिथे आहे तिथे, जे आहे ते'** या आधारावर विक्रीसाठी आहे.
**मालमत्तेचा पत्ता:** दुकान क्रमांक 1, 2, 16, 17 आणि 18 रिझवी टॉवर्स, 18 जून रोड, फार्मसी कॉलेजसमोर, सेंट इनेझ पणजी, गोवा 403 001
संपर्क व्यक्तिः **सुषमा दळवी** 88796 75188 | **आनंद नाइक** 93706 76029
जाहिरातीपासून 10 दिवसांच्या आत साइटला भेट द्या.